# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील **"प्रतिवेदक (कनिष्ठ)"** (गट-अ) (राजपत्रित) या पदासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

**अ) पदांची संख्या व आरक्षण :-** एकूण १६ पदे.

**मराठी प्रतिवेदक (कनिष्ठ) :-** १६ पदे (अ.ज.- २ पदे, वि.जा. (अ) - २ पदे, भ.ज. (क) - १ पद, भ.ज. (ड) - १ पद, वि.मा.प्र.- १ पद, इ.मा.व.- ५ पदे, अनारक्षित - ४ पदे (१ पद महिलांसाठी राखीव) ).

**ब) वेतनसंरचना :-** पीबी-३ रु.१५६००-३९१०० व ग्रेड वेतन रु.५४०० अधिक इतर भत्ते.

**क) शैक्षणिक पात्रता व इतर अर्हता :-** उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा पदवीधर असावा, **तसेच**

**<u>मराठी प्रतिवेदक (कनिष्ठ)</u> :-**

I) मराठी प्रतिवेदक (कनिष्ठ) पदाकरिता उमेदवाराने **१२० श.प्र.मि.** इतक्या गतीचे **मराठी लघुलेखनाचे** व किमान **४० श.प्र.मि.** इतक्या गतीचे मराठी टंकलेखनाचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र प्राप्त केलेले असावे.

**II) मराठी प्रतिवेदक (कनिष्ठ) या पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना प्रत्यक्षात मराठी श्रुतलेखनाची चाचणी परिक्षा १४० श.प्र.मि. या वेगाने द्यावी लागेल.**

**ड) वयोमर्यादा :-** शासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त उमेदवाराचे दिनांक १ जुलै, २०१५ रोजी वय किमान १८ वर्षे व कमाल ३३ वर्षांपेक्षा जास्त नसावे आणि मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत ३८ वर्षांपेक्षा जास्त नसावे. शासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांच्याबाबतीत उच्च वयोमर्यादा ४८ वर्षांपेक्षा जास्त असणार नाही.

**इ) परिविक्षा कालावधी :-** दोन वर्षे

**फ) इतर :-**

१) नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारास महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णयातील तरतुदीच्या अनुषंगाने संगणक अर्हतेबाबतचे प्रमाणपत्र विहित कालावधीत सादर करावे लागेल.

२) पदांच्या संख्येत / आरक्षणात वाढ अथवा घट होऊ शकते. याबाबतचे सर्व अधिकार नियुक्ती प्राधिकारी स्वत:कडे राखून ठेवत आहेत.

३) उमेदवारांकडून प्राप्त होणारा एखादा अर्ज किंवा सर्व अर्ज कोणतेही कारण न देता निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर नाकारण्याचे अधिकार राखून ठेवण्यात येत आहेत.

**<u>उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचना</u> :-**

१) उमेदवारांनी आपले अर्ज, उप सचिव, (आस्थापना), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, बॅकबे रेक्लेमेशन, मुंबई ४०० ०३२ या पत्त्यावर विहित नमून्यात संपूर्ण तपशिलासह नोंदणीकृत टपालाद्वारे **(By Regd. AD)** अथवा शीघ्र टपालाने **(Speed Post) शुक्रवार, दिनांक १४ ऑगस्ट, २०१५** पर्यंत प्राप्त होतील असे पाठवावे. ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्याचा स्पष्ट उल्लेख ठळक अक्षरात अर्जाच्या पाकीटावर करणे अनिवार्य आहे. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

२) उमेदवारांनी अर्जासोबत शैक्षणिक पात्रता, लघुलेखन व टंकलेखन, जात व वयासंबंधीच्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित केलेल्या सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे.

३) उमेदवारांना चाचणी परीक्षेस स्वखर्चाने हजर राहावे लागेल.

४) अर्जावर उमेदवाराचा अलिकडील पासपोर्ट आकाराचा फोटो लावण्यात येऊन त्यावर उमेदवाराची स्वाक्षरी आवश्यक आहे.

५) उमेदवारांना महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५ यातील लहान कुटुंबाची अट लागू राहिल.

६) शासनाच्या सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कार्यालयामार्फत अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

७) अर्जाचा नमूना **www.mls.org.in** या सचिवालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

८) पात्र ठरणाऱ्या मागास प्रवर्गाच्या उमेदवाराने नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत जात प्रमाणपत्राची वैधता संबंधीत जातपडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहिल. जात पडताळणी समितीने त्याचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर त्यास दिलेले नियुक्ती आदेश रद्द केले जातील.

९) निवड झालेल्या उमेदवारांना राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू राहिल.

१०) विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गांना उन्नत व प्रगत गटाचे तत्व लागू करण्यात आले असल्याने त्याबाबतची अद्ययावत प्रमाणपत्रे (नॉन क्रिमिलीअर प्रमाणपत्र) सादर केल्याशिवाय नियुक्तीचे आदेश देण्यात येणार नाही.

११) महिला आरक्षणांतर्गत निवड झालेल्या अनारक्षित प्रवर्गातील महिलांना उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) सक्षम प्राधिकाऱ्याचे नवीनतम प्रमाणपत्र नियुक्तीच्या वेळेस सादर करणे अनिवार्य आहे. या प्रमाणपत्राखेरीज उमेदवारास त्या आरक्षणाचा लाभ देण्यात येणार नाही.

( ऋतुराज ज. कुडतरकर )
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : २४ जुलै, २०१५**

# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**'मराठी प्रतिवेदक (कनिष्ठ)' (गट-अ) (राजपत्रित) संवर्गातील पदे सरळसेवेने भरण्यासाठी अर्जाचा नमुना.**

**प्रति,**

मा.प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई ४०० ०३२.

येथे अलिकडील पासपोर्ट आकाराचा फोटो लावावा व त्यावर स्वत:ची स्वाक्षरी करावी.

१) **पदाचे नाव** :-

२) **उमेदवाराचे संपूर्ण नांव**

**मराठीमध्ये** :-

(आडनाव) (स्वत:चे नाव) (वडिलांचे / पतीचे नाव)

**इंग्रजीमध्ये** :-

३) **उमेदवाराचा पत्ता** :-

**कायमचा पत्ता** :-

**पत्रव्यवहाराचा पत्ता** :-

४) **जन्मतारीख** :- ☐ **दिवस** ☐ **महिना** ☐ **वर्ष**

**अक्षरी :-**

**दिनांक १ जुलै २०१५ रोजी वय :-** ☐ **वर्ष** ☐ **महिने**

५) **दूरध्वनी / भ्रमणध्वनी क्र.** :-

६) **पुरुष / स्त्री** :-

७) **विवाहीत / अविवाहित** :-

८) **(अ) महिला आरक्षणातंर्गत अर्ज करु इच्छित आहात का ?** होय / नाही

**(ब) खाली नमूद केलेल्या प्रवर्गापैकी ज्या प्रवर्गातून उपरोक्त पदाकरिता अर्ज करु इच्छिता त्या प्रवर्गाखाली योग्य चौकोनात √ अशी खुण करावी.**

| अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | खुला |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

**(क) धर्म :-** ☐ **जात :-** ☐ **पोटजात :-** ☐

९) **(अ)** सेवायोजन कार्यालयात नाव नोंदणी केली आहे काय ? होय / नाही

**(ब)** असल्यास, सेवायोजन कार्यालयाचे नाव, नोंदणी क्रमांक व दिनांक :-

१०) **शैक्षणिक अर्हता :-**

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | परिक्षा मंडळाचे / विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | एकूण मिळालेले गुण | टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | | |
| २. | | | | | | |
| ३. | | | | | | |

११) (अ) **श्रुतलेखनातील गती :-** मराठी ☐ श.प्र.मि.

(ब) **श्रुतलेखन परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष** ☐ वर्ष

१२) (अ) **टंकलेखनातील गती :-** मराठी ☐ श.प्र.मि.

(ब) **टंकलेखन परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष** ☐ वर्ष

१३) **अनुभव असल्यास :-**

| अ.क्र | काम केलेल्या कार्यालयाचे / संस्थेचे नाव | धारण केलेले पद | कालावधी | | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत | |
| १. | | | | | |

१४) **अवगत असलेल्या भाषा :-**

मी असे प्रमाणित करतो/करते की, उपरोल्लिखित सर्व माहिती खरी व बरोबर असून त्यापृष्ठ्यार्थ मी प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती सोबत जोडल्या आहेत. तसेच मी याद्वारे असेही प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास माझी या पदासाठी झालेली निवड रद्द होईल तसेच मी कायदेशीर कारवाईस पात्र राहीन यांची मला जाणीव आहे. याबाबत नियुक्ती प्राधिकाऱ्याचा निर्णय माझ्यावर बंधनकारक राहील व माझी याबाबत कोणतीही तक्रार राहणार नाही.

**स्थळ :-**

**दिनांक :-**

( )

**उमेदवाराची स्वाक्षरी व नाव**

# प्र ति ज्ञा प त्र

## महाराष्ट्र नागरी सेवा लहान कुटुंबाचे प्रमाणपत्राचा नमुना-अ

## (नियम ४ पहा)

मी श्री./श्रीमती/कुमारी : ............................................ श्री./श्रीमती........................................ यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी वय ....... वर्ष राहणार .................. याद्वारे पुढीलप्रमाणे जाहिर करतो/करते की,

१) मी .................................. पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

२) आज रोजी मला ......... (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दि.२८ मार्च, २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ........ आहे. (असल्यास जन्म दिनांक नमूद करावा.)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८.३.२००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे मी सदर पदास अनर्ह / अपात्र ठरविण्यास पात्र होईन, याची मला जाणीव आहे.

**स्थळ :-**

**दिनांक :-** **(                              )**

**उमेदवाराची स्वाक्षरी व नाव**

**( टीप : अविवाहित उमेदवारांनी नमुना-अ प्रतिज्ञापत्र लागू नाही असे नमूद करणे आवश्यक आहे. प्रतिज्ञापत्रावर स्वाक्षरी नसल्यास अपूर्ण अर्ज आहे असे समजून अर्ज रद्द करण्यात येईल.)**